राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना
रुग्णालयांची श्रेणी व प्रोसिजर्सचे दर
निश्चिती- तपासणी समिती.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग.
शासन निर्णय क्र. रागांयो- २०१२/प्र.क्र.१३६/आरोग्य-६
मंत्रालय, मुंबई - ३२ ,
दिनांक :- ११ मे, २०१२

प्रस्तावना :- महाराष्ट्र राज्यातील दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील कुटुंबासाठी विमा कंपनीच्या सहभागाने नविन जीवनदायी आरोग्य योजना सुरु करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी निवड केलेल्या विमा कंपनी व राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी यांच्याकडून रुग्णालये योजनेमध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे. सदर रुग्णालयांना योजनेमध्ये समाविष्ट करताना त्यांची श्रेणी निश्चिती व श्रेणी निश्चिती प्रमाणे त्यांना लागू करावयाचे प्रोसिजर्सचे दर विमा कंपनीकडून निश्चित केले जात आहेत. त्या अनुषंगाने सदर श्रेणी निश्चिती व श्रेणी निश्चिती प्रमाणे लागू करावयाचे दर या बाबतची तपासणी करण्यासाठी समिती नियुक्त करणे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करावयाच्या रुग्णालयांची श्रेणी व सदर श्रेणी नुसार शासनाने ठरवून दिलेल्या प्रोसिजर्सच्या दरांच्या अंतिम मर्यादेत राहून संबंधित रुग्णालयांना नॅशनल इन्शुरन्स कंपनी व एम.डी.इंडिया (टी.पी.ए.) यांनी दर लागू केले आहेत. सदर श्रेणी व प्रोसिजर्सचे दर यांची तपासणी करुन आवश्यक त्या सुधारणा व उपाय योजण्यासाठी खालील प्रमाणे समिती स्थापन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी, (रा.गां.जी.आ.यो.), मुंबई | सदस्य |
| ३.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई | सदस्य |
| ४.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई | सदस्य |

२८७
१४/५/१२

५. उप सचिव, (आरोग्य-६) सदस्य
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई

६. संबधित शासकीय रुग्णालयांचे अधिष्ठाता/ सदस्य
जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक

७. सहाय्यक संचालक, (रा.गां.जी.आ.यो.), मुंबई सदस्य सचिव

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( अ.सं.फडतरे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. मंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री, आरोग्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, आरोग्य भवन, मुंबई
उप सचिव, आरोग्य-६ सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व शासकीय रुग्णालयांचे अधिष्ठाता/जिल्हा शल्यचिकित्सक/शासकीय रुग्णालयांचे वैद्यकिय अधिक्षक
सहाय्यक संचालक, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना, आरोग्य भवन, मुंबई
निवड नस्ती.